**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १७८ वा ● शनिवार १८ नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 178 | Date : 18/11/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4


## ओबीसी तसेच आर्थिक मागास प्रवर्गातील मुलींची १०० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शासन करणार : मंत्री चंद्रकांत पाटील

मुंबई : आठ लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागास वर्ग तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील मुलींच्या सर्व अभ्यासक्रमाची १०० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल, असा ठराव मराठा आरक्षण व इतर सोयीसुविधांबाबत मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. हा ठराव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात येऊन मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर हा निर्णय लागू करण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. त्याचप्रमाणे मागील



तीन वर्षात प्रलंबित राहिलेल्या शुल्क प्रतिपूर्तीची १०० टक्के परतफेड करण्यासाठी येत्या अधिवेशनात तरतूद करण्यात येणार असल्याचे मंत्री श्री.पाटील यांनी सांगितले.

मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण व इतर सोयीसुविधांबाबत मंत्रिमंडळ उपसमितीची तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ तसेच सारथी महामंडळाची आढावा बैठक आज मंत्रालयात संपन्न झाली. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे संचालक नरेंद्र पाटील, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे, व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते तसेच, सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर, उमाकांत दांगट मधुकरराव कोकाटे, डॉ. नवनाथ पासलकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

यावेळी मंत्री श्री. पाटील म्हणाले की, मराठा । पान २ वर

## सुमारे ७०० वर्षांपूर्वीचे विठ्ठल मंदिर पुन्हा अवतरणार

### ७३ कोटी विकास आराखड्याचे टेंडर फायनल

सोलापूर: ज्ञानोबा, तुकाराम आदी संतांच्या काळातील म्हणजे ७०० वर्षापूर्वीचे विठ्ठल मंदिर कसे असेल याची सगळ्यांनाच उत्कंठा लागलेली आहे. आता या ७३ कोटींच्या विकास आराखड्याच्या कामांना लवकरच सुरुवात होणार आहे. पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या टेंडर प्रक्रियेत मुंबई येथील विठ्ठल मंदिराच्या ७३ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याचे काम सावनी हेरिटेज अँड कॉन्सर्व्हेशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला मिळालं आहे.

पहिल्या टप्प्यातील २६ कोटी रुपयांच्या कामाची सुरुवात कार्तिकी यात्रेनंतर होण्याचे संकेत



मंदिर प्रशासनाने दिले आहेत. पुरातत्व विभागाने दिलेल्या निविदेत आता ठेकेदार निश्रि्चत झाल्याने पहिल्या टप्प्यात नेमकी कोणती कामे करायची यासाठी पुरातत्व विभाग, मंदिर समिती आणि ठेकेदार यांची एक बैठक जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद घेणार आहेत. त्यानंतर या कामाला सुरुवात होईल असे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी बोलताना सांगितले.

नामदेव महाद्वार, दर्शन व्यवस्था, महालक्ष्मी मंदिरावरील स्लॅब, शनी मंदिराजवळील काम आणि मंदिरातील दगडी फ्लोरिंग या कामाला पहिल्या टप्प्यात सुरुवात होण्याची शक्यता आहे. विठ्ठल आणि रुक्मिणी गाभाऱ्यात लावलेले ग्रॅनाईट आणि मार्बल हटवून पूर्वीच्या मूळ दगडी भिंती पुन्हा भाविकांना पाहता येणार आहेत. याशिवाय संपूर्ण मंदिराचे फ्लोरिंग हे मूळ दगडी केले जाणार आहे.

संत ज्ञानेश्र्वर, तुकाराम यांच्या काळात ज्या पद्धतीने विठ्ठल मंदिराचे स्वरूप होते त्याच पद्धतीने आता भाविकांना । पान २ वर

## समाज एकमेकांसमोर उभे आहेत, ही परिस्थिती योग्य नाही

### ओबीसी विरुद्ध मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर फडणवसांची प्रतिक्रिया

नागपूर : आरक्षणाच्या मुद्द्यावरुन दोन समाज एकमेकांसमोर उभे राहतात ही परिस्थिती योग्य नाही, असं म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केलं आहे. सध्या राज्यात ओबीसी विरुद्ध मराठा अशी परिस्थिती पाहायला मिळतेय. त्यातच जालन्यातील अंबडमध्ये ओबीसी नेत्यांकडून ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन करण्यात आहे. त्याचप्रमाणे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. त्यामुळे राज्यात सध्या आरक्षणाचा मुद्दा जोर धरु लागलाय.ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, असा विश्र्वास देखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नागपुरात दाखवला. त्याचप्रमाणे राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यसाठी कटिबद्ध असल्याचं देखील यावेळी त्यांनी सांगितलं. राज्यात सध्या आरक्षणाचा मुद्द जोर धरु लागलाय. मी पहिल्यांदा तर सर्व समाजाला विनंती करू इच्छितो की, महाराष्ट्रात कुठलेही समाज एकमेकांसमोर उभे आहेत, अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होणे योग्य नाही. ओबीसी समाजाला अस्वस्थ करू इच्छितो की कुठल्याही परिस्थितीत राज्य सरकार ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. आम्ही मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात संकल्पबद्ध आहोत, त्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट देखील केले आहे. कुठल्याही परिस्थितीत ओबीसी समाजावर अन्याय होईल, असा निर्णय राज्य सरकार घेणार नाही. याबाबत मनातून शंका काढून टाकावी आणि महाराष्ट्रात शांतता कशी नांदेल याचा प्रयत्न करुया.

## तुझ्यासारखं सासऱ्याच्या घरी तुकडे मोडत नाही; ओबीसी सभेतून भुजबळांचा जरांगेंवर हल्लाबोल

जालना : अंबड येथील सभेतून छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्यावर निशाणा साधला आहे. यावेळी बोलतांना भुजबळ म्हणाले की, मराठा समाजाचे नवीन झालेले नेते त्यांना हे आरक्षण कळणार नाही, ते त्यांच्या डोक्याच्या बाहेर आहे. कुणाचं खाताय म्हणतो, अरे तुझं खातो काय?, यांना काहीच माहित नाही. अरे आरक्षण काय आहे आधी ते तर समजून घे, आमचा मराठा आरक्षणाला विरोध नाही. छगन भुजबळ दोन वर्ष बेसन भाकर खाऊन आला असा म्हणतो, हो खातो बेसण भाकर कांदा आजही खातो. पण, तुझ्यासारखं सासऱ्याच्या घरी तुकडे मोडत नाही, असा जरांगेंना भुजबळांनी टोला लगावला आहे. आमची सुद्धा लेकरं आहे, तुम्ही वेगळ आरक्षण घ्या, असे भुजबळ म्हणाले.



मराठा समाजाला ओबीसीमधून सरसकट आरक्षण देऊ नये या मागणीसाठी जालन्यातील अंबडमध्ये ओबीसींची जाहीर सभा होत आहे. ओबीसीमधून मराठा समाजाला सरसकट आरक्षण देऊ नयेत यासाठी सर्वात आधी मंत्री छगन भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. त्यानंतर त्यांना ओबीसी नेत्यांचा देखील पाठिंबा मिळाला. दरम्यान, मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण देऊ नका या मागणीसाठी आज जालन्यात भव्य सभा आयोजित करण्यात आली असून, या सभेत भुजबळांची प्रमुख उपस्थिती आहे. तर याच सभेच्या भाषणातून देखील भुजबळ आपली भूमिका मांडत आहे.

माजी आमदार आशिष देशमुख यावेळी बोलतांना म्हणाले की, बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात होत असलेल्या आंदोलनास्थळी सर्वात अगोदर देवेंद्र फडणवीस आले होते. ओबीसींना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले आहे की, सरसकटचे दाखले मराठा समाजाला देता येणार नाही. ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचं काम मनोज जरांगे करत आहेत. त्यामुळे, । पान २ वर

## भुजबळांचं वय झालं, पण आम्ही देखील कच्चे नाही; जरांगेंकडून प्रत्युत्तर

सांगली : छगन भुजबळ यांनी केलेल्या टीकेला मनोज जरांगे यांनी प्रतिउत्तर दिले आहे. मराठा समाजाने आता ठरवले आहे, आम्ही त्यांच्या टीकेला उत्तर देणार नाही. त्यांना तेच काम उरले आहे. लोकांचे खाल्ल्याने ते आतमध्ये जाऊन आले आहेत. कोण कुणाचे खात आहे सर्वांना माहित आहे. त्यामुळे त्यांनी यावर बोलू नाहीत. तुम्ही टीका केली तर, तुम्हाला उत्तर देण्यासाठी आम्ही कच्चे नाहीत. या राज्यात आम्ही वातावरण खराब होऊ देणार नाही. आता आम्ही देखील ५० टक्के आहे. लोकांचे पैसे खाता, रक्त पिता का? मग तुम्हाला कोण देव मानणार आहे. वयाने तुम्ही मोठे आहेत. आम्हाला काढायला लावू नयेत. आम्ही देखील तुमचा बायोडेटा काढला आहे. धमक्या देऊ नयेत, असे जरांगे म्हणाले. । पान २ वर

## ऐन कार्तिकीच्या तोंडावर पंढरपुरात झिका व्हायरसचा शिरकाव, मुंबईहून आलेल्या डॉक्टरांना लागण

पंढरपूर/प्रतिनिधीः कोरोनाची डोकेदुखी संपली असली तरी, आता नव्या आजारानं प्रशासनाची चिंता वाढवली आहे. देशात आता झिका व्हायरसनं डोकं वर काढलं आहे. पुण्यानंतर आता पंढरपुरात झिका व्हायरसचा संशयित रुग्ण आढळून आला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुण्यात एका व्यक्तिला झिका व्हायरसची लागण झाल्याचं निष्पन्न झालं होतं. ऐन कार्तिकी यात्रेच्या तोंडावर पंढरपूर शहरात झिका व्हायरसचा संशयित रुग्ण आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. मुंबईवरून एक महिन्यापूर्वी आलेल्या डॉक्टरला पंढरपूरमध्ये पोहचल्यावर त्रास जाणवू लागल्याने पुणे येथे जहांगीर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. झिका व्हायरसची चाचणी पॉझिटिव्ह आली. लागण ठ मुंबईत झाली आणि उपचार पुण्यात सुरू आहेत . त्यांची तब्येत आता चांगली असून पंढरपूरमध्ये सगळीकडे तपासणी सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत एकही झिका व्हायरस रुग्ण सापडलेला नाही . त्यामुळे यात्रेच्या तोंडावर काहीतरी करून येणाऱ्या लाखो भाविकांनी घाबरण्यात अर्थ नाही.

येत्या २३ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशी आहे. यात्रेसाठी राज्यासह परराज्यातून सुमारे सात ते आठ लाख भाविक येतील असा अंदाज आहे. यात्रेची तयारी सुरू असतानाच कोल्हापूर, पुणे नंतर पंढरपूर शहरातील एका व्यक्तीला झिका व्हायरसची लागण झाल्याची माहिती समोर आली आहे. डेंग्यू आजारात जी लक्षणे दिसून येतात तशीच झिका व्हायरसच्या आजाराची लक्षण आहेत. झिका व्हायरस हा जीवघेणा । पान २ वर



## कार्तिकी यात्रा कालावधीत स्वच्छतेला प्राधान्य द्यावे : जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद

पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. यात्रा कालावधीत भाविकांना आवश्यक सुविधा देण्याबरोबरच स्वच्छताही महत्वाची आहे. संबंधित सर्व शासकीय यंत्रणांनी शहरात येणाऱ्या वारकरी व भाविकांना स्वच्छता पाहून समाधान वाटावे अशा प्रकारे स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत व आपत्ती व्यवस्थापन आराखड्याबाबत शासकीय विश्रामगृह, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आली होती. यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अर्चना गायकवाड, राज्य उत्पादन शुल्कचे एस.आर. कुसळे,तहसिलदार सुशिल बेल्हेकर, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव,कार्यकारी अभियंता अमित निमकर, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भिकाजी भोळे, तालुका आरोग्य डॉ. एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ. जयश्री ढवळे, तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, कार्तिकी यात्रा कालावधीत पंढरपूरात येणाऱ्या वारकरी भाविकांना प्रशासनाकडून तसेच मंदीर समितीकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. यामध्ये दर्शन, पत्राशेड, नदीपात्र वाळवंट, ६५ एकर तसेच आवश्यक ठिकाणी तात्पुरते शौचालय उभारण्यात येतात. या शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता व मुबलक प्रमाणात पाण्याची उपलब्धता करण्यात यावी. तसेच मंदीर परिसर , दर्शन रांग, नदी पात्र, प्रदक्षिणा मार्गाच्या स्वच्छतेसाठी जादा स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. वाळवंटात असणारे दगड, कपडे, कचरा काढून घ्यावा.

भाविकांना यात्रा कालावधीत स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाण्याची उपलब्धता ठेवावी. नदी पात्रावरील सर्व घाटांची स्वच्छता करण्यात यावी. अन्न व औषध प्रशासन विभागाने तात्काळ प्रसादाची दुकाने व खाद्यपदार्थांची दुकाने, किराणा दुकाने यांची तपासणी करावी. भेसळ करणाऱ्या दोषींवर तात्काळ कार्यवाही करावी. दर्शन रांगेजवळ असणाऱ्या तात्पुरत्या विश्रांती कक्षामध्ये भाविकांना औषध उपचार केंद्र, स्वच्छ पिण्याचे पाणी, चहा, नाश्ता, शौचालय आदी सुविधांची उपलब्धता करावी. दर्शन रांगेतील भाविकांचे जलद दर्शन व्हावे यासाठी दर्शन रांगेत ज्या ठिकाणाहून घुसखोरी होण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेसह सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे. मंदीर परिसर व प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमणे तात्काळ काढण्यासाठी नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्त पथकांची नेमणूक करावी. अशा सूचनाही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.

वारकरी भाविकांसाठी देण्यात आलेल्या उपलब्ध सुविधांची माहिती लाऊड स्पिकरव्दारे वेळोवेळी द्यावी. मंदीर समितीने भाविकांच्या सुरक्षेसाठी दर्शन रांग, स्काय वॉक, दर्शन मंडप, मंदीर येथील फायर, स्ट्रक्चर व इलेक्ट्रिक ऑडिट करुन घ्यावे. अग्नीशमन यंत्रणा सज्ज ठेवावी. महावितरने ६५ एकर व वाळवंटात तात्पुरती वीज जोडणी देताना सुरक्षित पध्दतीने द्यावी. वारकरी, भाविकांना गॅस टाकी देताना पुर्णपणे चेक करुन द्यावी यासाठी संबधित गॅस कंपनीच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. पशुसंवर्धन विभागाने जनावरांच्या बाजार तसेच नाक्यावर तपासणी मोहिम राबवावी व औषधांची उपलब्धता ठेवावी असे निर्देशही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी



दिले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे संचालक राहिलेले निवृत्त कर्नल व्ही. एन. सुपनेकर यांनी कार्तिक वारी कालावधीमध्ये घटना प्रतिसाद प्रणाली (खठड) आणि त्याद्वारे गर्दी नियोजनाशी निगडीत आपत्ती व्यवस्थापन यामध्ये गर्दी, चेंगराचेंगरी, त्याचे प्रकार, त्याचे रूपांतर मोठ्या आपत्तीमध्ये कसे होते अशा प्रकारच्या आपत्तीचे व्यवस्थापन कसे करावे, याबाबत माहिती दिली.

तत्पुर्वी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्राशेड, तात्पुरते विश्रांती कक्ष, महाव्दार घाट, कासार घाट, नदीपात्र, ६५ एकर व मंदीर परिसराची पाहणी करुन संबधितांना आवश्यक सूचना दिल्या. तसेच कार्तिक यात्रा कालावधी वारकरी-भाविकांच्या आरोग्य सुविधेसाठी महाआरोग्य शिबीर ६५ एकर येथे होणार असून त्या ठिकाणची पाहणीही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केली.

## संपादकीय

### संशयाचे धुके..

पुण्यातील ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता (डीन) संजीव ठाकूर यांना दणका देत मुंबई उच्च न्यायालयाने त्यांची डीन पदावरून हकालपट्टी केली आहे. ललितला ससून रुग्णालयात पंचतारांकित सुविधा देण्यात ठाकूर यांचा हात असल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. यामुळे पुन्हा एकदा या ड्रग्ज प्रकरणाच्या चर्चांनी जोर धरला आहे. महाराष्ट्र पोलिसांचे अमली पदार्थविरोधी पथक आणि केंद्राच्या नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरोच्या पथकांनी वेळोवेळी कारवाई करून राज्यातील ड्रग्ज तस्करीचे धागेदोरे बऱ्यापैकी उलगडले आहेत. ड्रग्ज तस्करी आणि उत्पादन करणाऱ्या डझनभराहून अधिक आरोपींना पोलिसांनी अटक केली असून नाशिक, पुणे, पालघर, सोलापूर आदी ठिकाणचे कोट्यवधी रुपयांच्या एमडी ड्रग्ज उत्पादनाचे कारखानेही उद्ध्वस्त केले आहेत. काही ठिकाणी तर गुजरातमधील तपास यंत्रणांनी महाराष्ट्रात येऊन कारवाई केली. यावरून हे ड्रग्ज रॅकेट देशभरात सक्रिय असण्याची शक्यता नाकारता येत नाही. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्यानुसार मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचण्यासाठी थोडी कळ सोसावी लागेल. त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. जसजशी या प्रकरणातील तथ्ये बाहेर येतील, तसतशी अनेकांची तोंडे बंद होतील, असा इशाराही फडणवीस यांनी दिला आहे. फडणवीस यांच्या या इशाऱ्यामागे अर्थातच काही राजकीय समीकरणे आहेत. ललित पाटील ड्रग्ज तस्करी प्रकरणात काही राजकीय नेत्यांचा खास करून राज्याच्या महायुती सरकारमध्ये सामील असलेल्या मंत्र्यांचा सहभाग असल्याचे आरोप शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे आणि काँग्रेसचे पुण्यातील कसबा पेठचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केले होते. यामुळे महायुती सरकार काही काळ अडचणीत आले होते. धंगेकरांच्या आरोपानंतर परवा राज्याचे अतिरिक्त पोलीस संचालक संजय सक्सेना यांनी ड्रग्ज प्रकरणाचा तपास योग्य रीतीने सुरू असून त्यात कुठल्याही राजकीय नेत्याचा सहभाग नसल्याचा खुलासा केला आहे, परंतु हा खुलासा पुरेसा नाही. फडणवीसांच्या म्हणण्याप्रमाणे ड्रग्ज तस्करी प्रकरणाचा मुख्य सूत्रधार हाती लागेल तेव्हा लागेल, त्यासाठी सरकारने निश्चितच वेळ घ्यावा, परंतु हाती आलेला चौकशी अहवाल सार्वजनिक करून त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्याची धमकदेखील दाखवावी, अन्यथा ड्रग्ज तस्करीच्या नावाखाली कारवाईची थट्टामस्करी होतच राहील. त्यामुळे या गुन्ह्यात सामील प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत राजकीय नेत्यांवरील संशयाचे धुकेही अधिक गडद होत जाईल.

# महापुरुषांच्या नावाने स्त्रियांनी किती दिवे लावले?

महापुरुषांचे दैवीकरण व्हावे हा मुळीच उद्देश नाही. परंतु ज्या महापुरुषांनी आपल्या जीवाचे रान करून, प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात जाऊन केवळ आणि केवळ जनसामान्यांचा उद्धार करण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. विरोध, घर परिवार यांचा थोडाही विचार न करता. जातीभेद विषमता व अंधविश्र्वासाला थारा न देता लोकांवर सामाजिक संस्कार घालून समाजाला जागृत केले त्या महापुरुषांच्या प्रती आदरभाव व्यक्त करणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. माणसाकडे प्रामाणिक मन, जागृत मेंदु असेल तर नैतिक पातळी आपोआपच परिपक्व होत असते. दिवाळी हा सर्वात मोठा सन म्हणून साजरा केला जात असेल, आणि दिव्याला अर्थात प्रकाशाला महत्त्व दिले जात असेल तर नक्कीच एक दिवा ज्ञानाचा लाऊन जीवनातील अज्ञान, अंधविश्र्वास, पाखंड, थोतांड दुर होऊन मानसिक परिपक्वता येण्यासाठी एखादा दिवा लाऊन स्वतः ला जागृत करणे आवश्यक असते. दूसरी गोष्ट असंख्य दिवे लाऊन केवळ घराची शोभा वाढवायची नसते तर स्वतः च्याही डोक्यात प्रकाश निर्माण होईल असे कृत्य आपल्याला करायचे असते. घराबाहेर दिवा लाऊन घरात जर अज्ञान आणि आणि मानसिक व वैचारिक अंधकार असेल तर ते दिवे लावणे व्यर्थ होय. दिवाळी सन हिंदु सोबतच अनेक बौद्ध ही साजरा करतात. हिंदु धर्म सोडून धम्माचा स्विकार केला तरीही घरातील हिंदु धर्मातील आचरण मात्र बदलले नाही. हिंदु धर्मातील लोकांना वैचारिक जागृती करून प्रबोधनाच्या प्रवाहात आणणे आवश्यक असताना बौद्ध लोकच जस हिंदुचे अनुकरण करत असतील तर बौद्धांची मानसिक व वैचारिक पिछेहाट होत आहे हे मान्य करावे लागेल. हिंदू धर्मातील आचरण घरात व डोक्यात ठेऊन धम्माला बाटवण्याचा प्रयत्न केला गेला. धम्माला बाटवुन हिंदुनी सुधारणा करावी हे बोलणे मुर्खपणाचे ठरेल. थोडक्यात काय तर धम्माचे उपासक म्हणून बरेच लोक धम्माचे पालन करत नाहीत परंतु राष्ट्रसंत व महापुरुषांनी केलेल्या कार्याचा व विचाराचा यांना सन्मानही करता येत नाही. अनेक दिवे लाऊन सन उत्साहात साजरा केला जात आहे. परंतु महिलांनी एक दिवा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने लाऊन त्यांचे आभार मानले का? परस्त्रिचा सन्मान करणारे व स्त्रियांवर अन्याय करणाऱ्यांना कठोर शिक्षा देणाऱ्या छत्रपतींच्या नावाने एकही दिवा लावल्याचे उदाहरण समोर आले नाही. शेतकऱ्यांना सर्वतोपरी सुख सुविधा देऊन शेतकऱ्यांना सधन करण्यामागे ही छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य होते. शेतकऱ्यांची गवताची काडी सावकाराकडे गहाण राहु देणार नाही, आणि शेतकऱ्यांच्या मेथीच्या देठाला ही हात लागु देणार नाही अशी शेतकऱ्यांची काळजी घेणाऱ्या राजाला आनंदाच्या दिवशी वंदन करणे आपले नैतिक कर्तव्य नाही का? आजची शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती पाहता आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण येत नसेल तर आम्ही खरचं जागृत व वैचारिक इमानदार आहोत का? दिवाळीला सर्वच महिला चांगल्या साड्या घालुन चांगले खायला बनवतात, अंगावर परफ्यूम मारून दिवे लावतात तेव्हा आपल्याच साठी सावित्रीमाई फुले यांनी अंगावर शेणमाती घेतली, फाटक्या लुगड्यावर राहली, येथील व्यवस्थेचा विरोध असुनही मुलींना शिक्षण देऊन मुलींच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणला. आणि त्याच सावित्रीमाई च्या मुली आज शिकल्या सवरल्या पण ज्या सावित्रीमाई मुळे शिक्षणाचा प्रकाश आपल्या जीवनात आला त्या सावित्रीमाई फुले यांच्या बद्दल एक दिवा लाऊन सावित्रीमाई फुलेंचे धन्यवाद मानने खरचं अगत्याचे नाही का? सुख समृद्धी सावित्रीमाई मुळे घरात आली नाही का? सावित्रीमाई ला वंदन करून आपण महोत्सव करू शकत नाही का? आजही शिकलेल्या महीला जर सावित्रीमाई फुले यांना सोडून सन उत्सव साजरे करत असतील तर एकतर महिला आजही अज्ञानी आहेत कींवा सावित्रीमाई फुले यांनी अज्ञानातून प्रकाशाकडे, अंधविश्र्वास, पाखंड व थोतांडातुन विज्ञानाकडे, मानसिक गुलामीकडून मानसिक स्वातंत्र्याकडे जाण्याचा जो मार्ग दिला तो मार्गच मान्य नाही असेच दिसून येते. आज आरक्षणा बद्दल अनेक राजकीय गदारोळ सुरू आहे. आरक्षणाचा मुद्दा पेटवून अनेक लोक स्वतः ची राजकीय झोळी भरून घेत आहेत. ज्यांना आरक्षण मिळाले त्यांना स्वतः ला सिद्ध करण्याची संधी मिळाली, आणि या आरक्षण असुनही या व्यवस्थेने त्यांना ते मिळू दिले नाही म्हणून आजही आरक्षणावर अनेक आंदोलन सुरू आहेत. म्हणजे आज आरक्षणाचे महत्त्व लोकांना कळत आहे. आरक्षणा विषयी एवढे जागृत झालेल्या स्त्रियांनी आरक्षणाचे जनक राजर्षी शाहु महाराज यांच्या नावाने एखादा दिवा लावला का? आम्हाला आरक्षण हवे परंतु आरक्षण देणारे नको अशीच भुमिका घेतली असेल का? ज्यांनी आरक्षणाची सुरवात केली त्यांची तरी आठवण या दिनी करणे याला संस्कार म्हणत नाहीत का? शिव फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांना एकत्र बांधनी करून महिलांना सर्व अधिकार देऊन संपूर्ण स्वातंत्र्य न मागता बहाल करणारे बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने एखादा दिवा का लावला नसेल? चौकट ओलांडून बाहेर जाण्याचा अधिकार नव्हता आज डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानामुळे देशाच्या सिमा ओलांडून अनेक महिला रोज जात येत आहेत. पुरुषांच्या समोर उभा राहण्याचा त्यांच्या समोर बसण्याचा अधिकार नसलेल्या महिला संविधाधामुळे पुरुषांवरच नव्हे देशावर राज्य करत आहेत. ग्रामपंचायत सदस्य पासुन राष्ट्रपती पर्यंत, ग्रामपंचायत सचिवा पासुन प्रधानमंत्री सचिवापर्यंत जाण्याची हिंमत केवळ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली आहे त्याचे संरक्षण संविधानाने केले. स्त्रियांना पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन कामच नाही तर पगारही पुरुषांच्या प्रमाणात पगारही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे मिळतो, न मागता मताधिकार पुरुषांसोबत महिलांना ही प्रदान करणारे जगातील एकमेव व्यक्ती म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर होय. कारण पुरुषांप्रमाणे वेतन व मताधिकार या साठी विदेशात महिलांना आंदोलने करावे लागले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना फुकट दिले. कामावर असताना पगारी प्रसुती रजा, एका वर्षात तेरा महिन्याचा पगार ज्याला आज दिवाळी बोनस म्हणतात हि सर्व देण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आहे. पती व वडील यांच्या संपत्ती मधील वाटा, घटस्फोट, पुर्नविवाह, दत्तक सारखे अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना देऊन महिलांना सोन्याचे दिवस दिले. वरिल गोष्टी करताना हिंदु धर्मातीलच लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना विरोध केला म्हणून महिलांच्या हक्क अधिकारा साठी, महिलांच्या कल्याणासाठी कोणीही मागणी न करता मंत्रीपद सोडणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांच्या सर्वांगीण विकासासाचे उद्धारक ठरतात. काय त्या बाबासाहेब आंबेडकर व संविधान यांच्या नावाने एक दिवा लाऊन त्यांना वंदन करून त्यांचे धन्यवाद मानले? आजही या महापुरुषांचे विचार आम्हाला कळू नये एवढे आम्ही मानसिक अपरिपक्व आहोत? अशा अनेक प्रश्र्नांची उत्तरे आजही निरुत्तर आहेत. ज्या संतांनी सामाजिक प्रबोधन करून अंधविश्र्वास पाखंड व थोतांड बाजूला सारून समता बंधुता न्यायासाठी सामाजिक संस्कार घातले त्या संतांच्या नावाने एकही दिवा लावला जात असेल तर आपण आजही वैचारिक मागासलेले आहोत याची प्रचिती येते. थोडक्यात आपण दिवे लाऊन सन उत्सव किंवा कोणत्याही चांगल्या कामासाठी दिवा लावतोच परंतु आजही आमच्या डोक्यात वैचारिक प्रकाश पडला नाही हेच सिद्ध होते. ज्यांनी समाजातील अंधविश्र्वास, पाखंड, थोतांड भोंदूगिरी, बुवाबाजी, कर्मकांड, विषमता बाजूला सारून माणसाला माणूस म्हणून संस्कार घातले, मानसाचे कर्म व ज्ञान यावरून त्याचे श्रेष्ठत्व ठरायला पाहिजे यासाठी प्रबोधन केले. परंतु शोकांतिका आहे का ज्यांनी जिवनातील अंधकार, अज्ञान, गुलामी दुर करून स्वाभिमान, मान सन्मान, हक्क अधिकार देऊन आदर्श व निर्भय पणे जिवन जगण्याची ताकद दिली त्याच संत महापुरुषांना बाजूला सारून आजही अज्ञान, अंधविश्र्वास, पाखंड, भोंदूगिरी, बुवाबाजी याला महत्त्व दिले जाते. आमच्या संतांनी कधीच मंत्रोच्चार करून, धागा देऊन, राख लाऊन, पैसे घेऊन, दु:ख, आजार, कष्ट कमी होतील असे शिकवले नाही. संताच्या किर्तनात महिलांचा सन्मान व्हायचा. महिलांचा सन्मान करणाऱ्यां संताना महिला वंदन न करता सर्वांसमोर महिलांचा अवमान करून, महिलांचे बाहेरचे प्रकरण ओपण करू का अशा जाहीर धमक्या देऊन महिलांच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या भोंदूकडे जेव्हा महिलांची गर्दी दिसते तेव्हा मात्र लक्षात येते. सन उत्सव साजरे करताना दिवे केवळ अंधविश्र्वास म्हणून लावले जातात. दिव्याचा प्रकाश घरात आणि शिक्षणाचा प्रकाश डोक्यात आजही पडला नाही. ज्यांच्या डोक्यात शिक्षणाचा व जागृती चा प्रकाशच पडला नाही त्या ठिकाणी जागृत करणाऱ्यांना संत महापुरुषांना वंदन कसे होईल हाही प्रश्र्न मनात उभा राहतो. आणि मनात सर्वात मोठा प्रश्र्न उभा हाच राहतो की ज्या संत महापुरुषांनी आपले संपुर्ण आयुष्य ज्यांच्या साठी खर्ची घातले, ज्या महापुरुषांनी स्वतः च्या कुटुंबाकडे लक्ष न देता देशातील समस्त महिलांचे प्रश्र्न सोडवण्यासाठी आयुष्य खर्ची घातले, आणि त्या संघर्षाचा फायदा आजच्या महिला उपभोगत आहेत. सुख समाधान, धन, स्वातंत्र्य शिक्षण सर्व ज्या महापुरुषांमुळे मिळाले त्या महापुरुषांच्या नावाने स्त्रियांनी किती दिवे लावले?

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा:९१३०९७९३००**

पान १ वरुन

## ओबीसी तसेच आर्थिक मागास

समाजाला स्वत:चे स्वतंत्र आरक्षण मिळण्यासाठी सर्व्हे करण्यासाठी मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले (निवृत्त) उच्च न्यायालय अलाहाबाद, न्यायमूर्ती मारोती गायकवाड (निवृत्त), न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) या तीन सदस्यीय समितीचे कामकाज प्रत्यक्ष सुरू झाले असून त्यांना आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येईल,असे त्यांनी सांगितले. ही समिती टाटा सामाजिक विज्ञान संस्था, गोखले शैक्षणिक संस्था आणि ऑल इंडिया पॉप्युलेशन सायन्स या तीन नामांकित संस्थाच्या माध्यमातून सर्वेक्षणाचे काम करणार आहे. तसेच आतापर्यंत सुरू असलेल्या नोंदीच्या कामात मराठवाड्यात २२ हजार कुणबी नोंदी नव्याने आढळल्या असल्याचे मंत्री श्री.पाटील यांनी सांगितले.राज्यातील सर्व जिल्ह्यात मराठा समाजातील लाभार्थींना उद्योग व्यवसायासाठीच्या कर्जाचा व्याज परतावा करण्याची सुविधा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळांच्या जिल्हास्तरीय यंत्रणेच्या माध्यमातून व्यापक स्वरुपात सुरु आहे, सर्व जिल्ह्यात महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय सुरु करावे, त्याचसोबत महामंडळाच्या विभागीय कार्यालयांच्या माध्यमातून मराठा समाजातील रोजगार इच्छुकांसाठी रोजगार नोंदणी सुविधा उपलब्ध करुन द्यावी, अशा सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

मंत्री श्री.पाटील यांनी यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळांच्या जिल्हास्तरीय तसेच विभागीय यंत्रणांचा आढावा घेऊन सर्व जिल्ह्यात महामंडळांच्या स्वतंत्र कार्यालयांची व्यवस्था करण्याचे सूचित केले. यासाठी प्राधान्याने महसूल, कौशल्य विकास तसेच सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयांच्या अखत्यारीतील जागेत महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय सुरु करण्याचे सूचित केले ज्या ठिकाणी अशी जागा उपलब्ध नसेल त्याठिकाणी भाडयाने खाजगी जागेत तातडीने जिल्हा कार्यालयाची व्यवस्था कार्यान्वित करण्याचे सूचित केले. तसेच विभागीय स्तरावर महामंडळाने त्यांच्या विभागीय समन्वयकांच्या माध्यमातून रोजगार नोंदणी सुविधा सुरु करुन इच्छुकांचे रोजगार मेळावे आयोजन, संबंधित कंपन्यासोबत समन्वय साधावा. नोकरी इच्छुकांना मुलाखत प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे या माध्यमातून जास्तीत जास्त संख्यने रोजगार संधीची निर्मिती करावी. त्याचसोबत कर्ज इच्छुक लाभार्थींना व्यवसाय सुरु करण्यासाठीचे प्रशिक्षण प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने सारथी संस्थेसोबत समन्वय करण्याचे सूचित केले.

महामंडळाच्या योजनेमुळे व्यापक प्रमाणात लाभार्थींना सहाय्य मिळत आहे, त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी नवी मुंबई येथे महामंडळाच्या भवन उभारण्यासाठी सिडकोकडे पाच एकर जमीन ग्रहण करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा. महामंडळाने कर्ज दिलेल्या ७१ हजार ३७६ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करुन त्यांच्या व्यवसायाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या रोजगाराची माहिती संकलित करावी. तसेच महामंडळाच्या पाच हजार कर्ज लाभार्थी यांची कर्ज परतफेड पूर्ण झाली आहे, त्यांचे सर्वेक्षण करावे अशा सूचना मंत्री श्री.पाटील यांनी संबंधितांना दिल्या. दहा हजार ते दोन लाख पर्यंतच्या बँकेतून घेतलेल्या कर्जाच्या १०० टक्के व्याज प्रतिपूर्तीचा निर्णय उपसमितीने घेतला आहे. त्याचप्रमाणे देशांतर्गत शिक्षणासाठी घेतलेल्या शैक्षणिक कर्जाच्या १०० टक्के व्याज प्रतिपूर्तीचाही निर्णय उपसमितीने घेतला असल्याचे मंत्री श्री.पाटील यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत मंत्री श्री.पाटील यांनी सारथीच्या पीएच.डी फेलोशिपसाठीच्या विद्यार्थ्यांची सीईटी परिक्षा तातडीने घेण्याचे सूचित केले. यामध्ये पात्र झालेल्या विद्यार्थांना गुणवत्ता यादीनुसार फेलोशिप देण्याची प्रक्रिया राबवण्याचे सूचित केले. तसेच सारथी संस्थेच्या योजना अमंलबजावणीचा आढावा घेऊन त्यांनी मराठा समाजातील तरुण तरुणींना उच्च शिक्षण, स्पर्धा परिक्षा यासह शेतकरी वर्गासाठीच्या सर्व योजनांची प्रवेश प्रक्रिया तसेच प्रशिक्षण संस्था यांची निवड प्रक्रीया पारदर्शकपणे करण्याच्या सूचना यावेळी संबंधितांना दिल्या.

## सुमारे ७०० वर्षांपूर्वीचे विठ्ठल मंदिर

पाहायला मिळणार आहे. देशातील पुरातन मंदिराप्रमाणे विठ्ठल मंदिराला ७०० वर्षापूर्वीचे रूप मिळणार असल्याचे मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले. राज्य सरकार यासाठी प्रयत्न करत असून यासाठी पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाने हा विकास आराखडा तयार केल्याचे औसेकर यांनी सांगितले.

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या आराखड्याची विशेष परिश्रम घेतल्याने पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली ७३ कोटी ८० लाख रुपयाचा आराखडा मंजूर करण्यात आला होता. तोच आराखडा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू करण्यास निधीची तरतूद केल्याने आता विठ्ठलभक्ताना विठ्ठल मंदिराचे ७०० वर्षापूर्वीचे रूप येत्या काळात पाहायला मिळणार आहे.

विठुरायाच्या बाबतीत 'नाही घडविला, नाही बैसविला' ही मान्यता वारकरी संप्रदायाची आहे. विठ्ठल मंदिर हे ११ व्या शतकातील असल्याचे अभ्यासक मनात असले तरी त्याहीपूर्वीपासून विठुरायाचे हे मंदिर अस्तित्वात असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. आता पुन्हा ७०० वर्षापूर्वीचे मूळ मंदिराप्रमाणे या मंदिराला रूप देण्यासाठी हा आराखडा पुरातत्व विभागाच्या सूचनेनुसार बनविण्यात आला आहे. या आराखड्याचे पाच टप्प्यात कामे केली जाणार असून यात मंदिराला मूळ हेमाडपंथी रूप देण्यासाठी जिथे दगडांची झीज झाली आहे अशा ठिकाणी रासायनिक संवर्धन केले जाणार आहे. याशिवाय मंदिराचे आयुष्य वाढविण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात मजबुतीकरणाचे काम केले जाणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात नव्या पद्धतीने बांधलेले नामदेव महाद्वाराच्या आरसीसी काम पाडून तेथे मूळ मंदिराला शोभेल अशा पुरातन दगडात महाद्वार बनविले जाणार आहे. याशिवाय मंदिरावरून जाणारी दर्शन रांग काढून मंदिराशेजारी एक स्काय वॉक बनविला जाणार आहे. अखेरच्या टप्प्यात सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन यंत्रणा , वायरिंग आणि वातानुकूलित यंत्रणा याचे काम केले जाणार आहे. एका बाजूला विठ्ठल मंदिराचा विकास आराखडा राबविण्यासाठी राज्य सरकार कामाला लागले असले तरी लाखो विठ्ठल भक्तांची मागणी असलेल्या निवाऱ्यातील दर्शन व्यवस्थेबाबत शासन आणि मंदिर समिती काहीच करीत नसल्याने भाविकांच्या माथी तासंतास मरणप्राय वेदना सोसत दर्शन रांगेतील दर्शन घेणेच नशिबी असणार आहे.

## तुझ्यासारखं सासऱ्याच्या घरी

मनोज जरांगे यांनी आपला बाल हट्ट सोडावा, असे देशमुख म्हणाले.

बबनराव तायवाडे यावेळी बोलतांना म्हणाले की, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. मराठा आंदोलकांकडून सरकारवर दडपण आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. राज्यमागास वर्गाकडून अगोदरच ओबीसीमध्ये आहेत, त्यांचे सर्वेक्षण करू नयेत, असे म्हणाले. काँग्रेस आमदार राजेश राठोड यावेळी बोलतांना म्हणाले की, राज्यातले सखार कारखाने भटक्या आणि विमुक्त लोकांच्या जीवावर सुरू आहेत. ओबीसी नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या विरोधात वक्तव्य थांबवायला हवेत. या पुढे ओबीसी नेत्यांच्या विरोधात बोलत असेल, तर मोठा भाऊ असलेल्या लोकांना छोट करायला वेळ लागणार नाही, असे आमदार राजेश राठोड म्हणाले.

ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यावेळी बोलतांना म्हणाले की, जरांगेंच्या सभेला तितक्यात तोला मोलाचं उत्तर दिलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभा पाहावी, एका सभेवरती आम्ही थांबणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक ठिकाणी अशीच सभा होईल. जरांगे सभा मोठी झाली म्हणजे आरक्षण मिळत नसतं. भुजबळांकडे या तुम्हाला ते आरक्षणाचा मार्ग दाखवतील. एक भुजबळ तुम्ही पाडाल तर, १६० मराठे आम्ही पाडू, असा इशारा यावेळी शेंडगे यांनी दिला. भुजभळ म्हातारे झाले असले, तरी सिंह आहेत. भुजबळ साहेब तुम्ही आदेश द्या ओबीसींची सत्ता आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. कुणब्यांचे दाखले देतायत ते ताबडतोब बंद करा, अन्यथा २४ च्या निवडणुकीत कुठे पाठवायचं हे ओबीस ठरवेल. पालावरच्या भटक्या विमुक्तींच्या नोंदी का तपासल्या जात नाही, असेही शेंडगे म्हणाले.

लक्ष्मण गायकवाड म्हणाले की, विमुक्त भटके ओबीसी जोडा आणि प्रस्थापित मराठ्यांना पाडा. ईडा पीडा जाऊदे आणि ओबीसीचं राज्य येऊ द्या, आमच्या ताटात तुम्हाला जेऊ देणार नाही. ओबीसीचे राज्य आल्यावर तुमची गरिबी आम्ही दूर करू, पण आमच्या ताटात तुम्हाला जेवू देणार नाही. मराठ्यांची गरिबी २०२४ ला ओबीसीचं राज्य आल्यावर दूर करू, असे लक्ष्मण गायकवाड म्हणाले.

रासप प्रमुख महादेव जानकर म्हणाले की, ओबीसीचा जोपर्यंत पक्ष होत नाही, तोपर्यंत न्याय मिळणार नाही. जो पर्यंत ओबीसी समाजाचे पक्ष होत नाही, तोवर त्याला अर्थ राहत नाही. तर, काँग्रेस भाजपवाले तुम्हाला लुटून जातील असे जानकर म्हणाले आहे.

## भुजबळांचं वय झालं, पण

टीका करण्याचं कामच त्यांना आहे. त्यामुळे त्यांना महत्त्व द्यायचं नाही असं आम्ही ठरवलं आहे. त्यामुळे यापुढे त्यांना महत्त्व देणार नाही. राहुल गांधींनी विजय वेडट्टीवार यांना विरोधी पक्षनेता मराठ्यांच्या मुलांचं वाटोळं करण्यासाठी दिले आहे. त्यामुळे त्याप्रमाणे ते बोलत असतील. तर, पंकजा मुंडे यांना गोरगरिबांची जाण आहे. गोपीनाथ मुंडे यांनी गोरगरिबांचे कल्याण करण्यासाठी काम केलं आहे. त्यामुळे त्या या सभेला आल्या नसतील असेही जरांगे म्हणाले.

भुजबळांना निवडणुकीत पाडा असं मी कधीच म्हटलं नाही. आमच्या मराठ्याच्या नेत्यांना तुम्हाला पाडणे शक्यच नाही. आमचे नेते खूप नमुनेबाज असल्याचे जरांगे म्हणाले. तर, विजय वडेट्टीवार यांच्या टीकेला उत्तर देतांना जरांगे म्हणाले की. तुम्ही खाता किती. आम्ही तुमच्या लेकरांबद्दल कधी वाईट बोललो नाही. बकरे वगैरे म्हणून दुसऱ्यांच्या मुलांना वाईट बोलू नका. आम्ही तुमच्या लेकरांचं बकरे म्हणून कधी उल्लेख केला नाही. पण असे बोलून तुम्ही मुलांचं अपमान करत आहात. यांचा तोल गेला असेल, असा टोला जरांगे यांनी लगावला आहे.

## ऐन कार्तिकीच्या तोंडावर पंढरपुरात

आजार असल्याने आरोग्य विभाग खडबडून जागा झाला आहे. ताप येणं, डोकं दुखी आणि मळमळणे अशी झिका आजाराची प्राथमिक लक्षणं दिसून येतात.

प्रामुख्याने डासांच्या मार्फत हा आजार पसरतो. त्यामुळे जिल्हा हिवताप विभागाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून परिसरात धूळ फवारणी सुरू केली. या शिवाय लोकांमध्ये या आजाराविषयी जनजागृती केली जात आहे. बाधीत परिसरात हिवताप विभागाने कंटेनर सर्व्हे केला असून चार जणांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. याच परिसरातील गरोदर महिलांची तपासणी सुरू केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बिरसा मुंडा हे आदिवासीचे भगवानच नाही तर जीवनही आहेत.

## ✻ व्याख्याते मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन ✻ बिरसा मुंडा व गैंदसिह नायक जयंती सोहळा




अर्जुनीमोरगाव/प्रतिनिधीः वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत जगून अहोरात्र अंधकार दूर करण्यासाठी लढणारा लढवय्या बिरसा मुंडा हे क्रांतिकारक आहे. ही जमीन, हे पाणी व जंगल आमचेच आहे, यावर आमचाच हक्क आहे, आदिवासी समाजाला जागृत करण्याचे काम १८ व्या शतकात फक्त क्रांतीसूर्य धरतीआबा बिरसा मुंडा करणारे एकमेव आदिवासी महापुरुष होत. शिक्षणासाठी धर्मांतर करणे हा अन्याय आहे, तो दूर केल्याशिवाय आमचा आदिवासी समाज ओळखले जाणार नाही. आलेले संकट दूर करायला शिका, लढायला शिका व उलगूलानची क्रांती करा तीच आमची ओळख आहे, ही शिकवण देणारे बिरसा मुंडा हे आदिवासींचे भगवानच नाही तर जीवनही आहे असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक व युवा व्याख्याते प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते जयंती सोहळा कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर तुलाराम मारगाये यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच किशोर बेलखोडे, पोष्ट मास्टर दादाजी चुलपार, अनु. जाती कांग्रेस तालुका महासचिव धम्मदीप मेश्राम, माजी ग्रा. पं. ज्ञानू प्रधान बोळदे, पो. पा. हेमलता खोब्रागडे, ग्रामपंचायत सदस्य राकेश पहिरे बाराभाटी, श्रावण मेंढे, मोरेश्र्वर येरणे, प्रफुल्ल वालदे, पृथ्वीराज खोब्रागडे, ममता तिरपूडे, सरस्वता चाकाटे, मुकुंदा कुरसुंगे, चुन्नीलाल कोसरे, पारबता घरतकर दादाजी मेश्राम मनोहर कांबळे, चेतन येरणे कमलेश ब्राम्हणकर मेघराज प्रधान आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी माता दंतेश्र्वरी, राणी दुर्गावती, बिरसा मुंडा, शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, विर गैंदसिह नायक या महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. मंचावरील मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सकाळी आदिवासी गौरव रॅली काढण्यात आली, दुपारी विविध स्पर्धा घेण्यात आल्या, सदर कार्यक्रम रात्री ०८ वा. संत केजाजी महाराज मंदिर परिसर मदन नाईक बाराभाटी यांच्या आवारात पार पडला. या सोहळ्या दरम्यान प्रमुख पाहुणे म्हणून दादाजी चुलपार, ज्ञानू प्रधान, ब्राम्हणकर व श्री मारगाये यांनी थोडक्यात मत व्यक्त केले. मार्गदर्शन करतांना प्रा. नंदागवळी पुढे म्हणाले- बिरसा मुंडा यांनी जमिनीसाठी, जंगलासाठी व शिक्षणासाठी इंग्रज व ख्रिस्ती धर्मवाद्यासोबत लढा दिला, आदिवासींचे हक्क व अधिकार हे भारतीय संविधानानुसार मिळाले. तरी आजही या समाजावर अनेक भागात अमानुष अत्याचार केले जाते ते बंद करण्यासाठी आदिवासींनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. मोठी क्रांती केली पाहिजे तरच खरा आदिवासी ठरेल असे क्रांतीकारी विचार याप्रसंगी व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लालचंद मारगाये यांनी केले तर प्रास्ताविक अलोणे याने करून आभार कमलेश चव्हारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश चूलपार विजय चाकाटे संजय चव्हारे जागेश्र्वर आंदे युवराज ताराम अन्नाजी ताराम यांनी परिश्रम घेतले.

# नळदुर्गमध्ये राहात्या जाग्याचा कबाला मिळावा यासाठी आमरण उपोषण तहसिलदार यांच्या मध्यस्ती नंतर उपोषणकर्ते उपोषणावर ठाम




नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहरातील शासकीय जागेवर राहणाऱ्या कुटूंबियाच्या घर जागेची नगरपरिषद दप्तरी नोंद करुन प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजनेचा लाभ मिळावे या करिता नगरपरिषद कार्यालयसमोर वसंतनगर, दुर्गानगर, इंदिरानगर, बौध्दनगर, भिमनगर, डॉ आंबेडकर नगर येथील नागरिकांनी आमरण उपोषण सुरु केले आले. गेल्या पन्नास वर्षांपासून शासकिय जागेवर कब्जे वहिवटीनुसार राहणाऱ्या कुटूंबाच्या घरजागेची नगरपरिषद कार्यालयात नोंद करून प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास घरकुल योजना याचा लाभ मिळावा यासाठी नागरिक अनेक वर्षापासुन प्रशासनाच्या वाऱ्या केल्या आहेत या नागरिकांनी पुराव्यासह घर जागेचे भोगवाटदार म्हणून नोंद करण्यासाठी प्रस्ताव दाखल करुन तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतर सुद्धा नगरपालिका प्रशासन जागेची नोंद घेऊन ८ अ ची नक्कल देत नाही. त्यामुळे लाभार्थी शासकीय योजनेपासून वंचित राहत आहेत. याविषयी संबंधित प्रशासनाला अनेक वेळा मागणी करून ही प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे असा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण सह कार्यकर्ते सह उपोषणकर्त्यांना भेटी दिल्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनीही दूरध्वनीवरून चर्चा केली. तहसीलदार अरविंद बोळंगे, मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनीही उपोषणस्थळी येऊन उपोषणकर्त्याशी चर्चा करून प्रशासन यासंदर्भात सर्व ते काम करत आहे त्यामुळे आपण उपोषण मागे घ्यावे असे सांगितले. मात्र उपोषणकर्ते आपल्या मागण्यावर ठाम आहेत. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत आमरण उपोषणवरून उठणार नाही असा निर्णय घेतला आहे. माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या सह माझ्या नगरसेवक कमलाकर चव्हाण जेष्ठ पत्रकार विलास येडगे माजी नगराध्यक्ष शहबाज काझी माजी नगरसेवक विनायक अहंकारी उपनगराध्यक्ष नगरसेवक बसवराज धरणे उपोषणकर्त्याची भेट घेतली आणी उपोषणकर्त्याना दिलासा दिला .

# महापुरुषांच्या विचार प्रसाराचा वसा घेतलेला समाजसेवक



वाशीम/प्रतिनिधीः समाज विकासासाठी विविध समाज सेवक विविध उपक्रम राबवित असतात,समाजाच्या विकासासाठी ज्या ज्या महापुरुषाने महान कार्य केले त्याचा वसा घेऊन अनेक समाज सुधारक कार्य करतात , समाजा मध्ये एकता यावी,त्यांचे राहणीमान सुधारावे या साठी प्रसंग मागासवर्गीय समाज कल्याण संस्थेची स्थापना करून ,वैद्यकीय सेवा देत असताना विविध समजभिमुख उपक्रम एक ध्येयवेड्या डॉक्टर करीत आहे त्यांचे नाव आहे डॉ. गजपाल इंगोले ,वाशीम जिल्ह्यातील अतिशय दुर्गम भागात वास्तव्यात असलेले व आता नौकरी निमित्त मुंबई ला स्थाईक झालेले हे कुटुंब ,महापुरुषाचे विचाराची कास घेतलेले,त्यांचे विचार आचरणात आणत ते जन सामन्यात रुजावे महणून अहोरात्र प्रयत्न करणारे हे डॉक्टर,समाजाला लगलेले विषमतेचे वेड आपल्या महापुरुषांच्या विचाराने धुऊन काढण्यासाठी त्यांचे साहित्य विविध समाजातील महापुरुषाचे विचार जपत लोकपर्यंत पोहचविण्याचे ते कार्य करतात,

समाजाचा विकास साधायचा असेल तर महापुरुषाचे विचार घराघरात पोहचले पाहिजे अशी यांची धारणा आहे त्यासाठी ह्या महान राज्याने सयाजीराव गायकवाड यांनी डॉ बाबासाहेब यांना शिष्यवृत्ती देऊन उपकृत केले त्यांचा इतिहास समोर यावा म्हणून शासनाने प्रकाशित केलेले ६५ ग्रंथ त्यांनी समाजातील विविध मान्यवरांनी भेट दिले,भटक्या विमुक्तांच्या मूळचे कारण ते राजे होते ही अस्मिता त्यांना माहीत व्हावी म्हणून होळकर घराण्याचे इतिहास २५ खंड समाजात कार्य करणाऱ्या विविध मान्यवर यांना भेट देऊन त्यांच्या कार्याची महती ते पटवून देतात,ब्रिटिश राजवटीत शरण न जाणारे एकमेव घराणे मंजे होळकर घराणे आहे हे ते इतिहासातील पुरावे देऊन पटवून देतात,होळकरांचा इतिहास घराघरात पोहचावा यासाठी ते जीवाचे रान करतात , सर्व माळ घाटात जे बारव बंधेलेले आहेत ते राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेले आहेत ,एवढेच नव्हे तर पशू चे दवाखाने त्यांनी काढलेले आहे याचा इतिहास साक्षी आहे याचा ते प्रसार करतात,आपल्या महापुरुषाचे विचार समाजात शेवटच्या टोकापर्यंत पोहचवावे या साठी ते प्रयत्नशील असतात.

साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य ४ खंड समाजात कार्य करीत असलेले समाज सेवक यांना मोफत देऊन त्यांना हा उपक्रम करण्यास उन्मुक्त करतात . अण्णाभाऊंनी निर्माण केलेले साहित्य साता समुद्रा पलीकडे गेले परंतु आपण अजून त्या पासून दूर आहोत ही खंत त्यांच्या मनात आहे ,घराघरात अण्णा तयार होऊन ही विषमता नष्ट करण्यासाठी तयार व्हावा या साठी ते कार्य करतात .महिन्यातून ४ वेळा गावाकडे येऊन ते हे समाज कार्य करीत असतात त्यांच्या ह्या कार्याचा समाजातून विविध मान्यवरांनी स्तुती केली आहे ,त्यांच्या या उपकरणाची समाजातील विविध स्तरातून स्तुती होत आहे

# चपळगाव मध्ये तब्बल-२८ वर्षांनी अविस्मरणीय माजी विद्यार्थी मेळावा संपन्न



अक्कलकोट/गौतम बाळशंकरः चपळगाव- ग्रामीण विद्या विकास विद्यालय चपळगाव प्रशालेत गुरुवार- दिनांक-१६ नोव्हेंबर रोजी वर्ष१९९५/९६ व वर्ष२००२/०३ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता- दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा अविस्मरणीय असा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रथम सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात सामूहिक राष्ट्रगीत गायले. प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष 'मरहुम इनायतअली पटेल व संस्थापक सचिव तथा प्राचार्य- स्व. पी. वाय. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष -संस्थाध्यक्ष - श्री. रविकांत पाटील व मंचावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . स्वागत व प्रास्ताविक बाळू बनसोडे यांनी केले. माजी प्राचार्य - श्री. मठ देवरू सरांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेचे माजी विद्यार्थी तथा पी ए इनामदार - पुणे या संस्थेमध्ये कार्यरत असलेले प्राध्यापक श्री. शब्बीर फुलारी लाभले. बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण प्रणालीकडे वळवणे काळाची गरज आहे असे मत मांडले. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी शाळेनेआम्हाला खूप काही दिले आहे आज आम्ही जे भक्कमपणे उभे आहोत ते केवळ आमच्या गुरुवर्यांनी आम्हाला दिलेले ज्ञान आमच्यावर केलेले संस्कार यांच्यामुळेच आज आम्ही घडलो आहोत असे गौरवोद् गार काढले.काही मुले तर शाळा व शिक्षक यांच्या विषयी बोलताना भावुक झाले होते.जवळपास २८ वर्षाने ही सर्व मुले एकत्र जमले होते याचा खूप मोठा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून आला .वर्ष ९५ -९६ च्या विद्यार्थ्याकडून शाळेसाठी डिजिटल अँड्रॉइड टीव्ही भेट स्वरूपात देण्यात आले तर वर्ष २००२-०३ च्या विद्यार्थ्याकडून शाळेतील मुलांसाठी चाळीस हजार रुपयाचे बाल वाङ्मय साहित्य व एक कपाट भेट स्वरूपात देण्यात आले.यावेळी सर्व प्रमुख अतिथी व आजी- माजी प्राचार्य तथा शिक्षकांचा सत्कार विद्यार्थिनींच्या हस्ते करण्यात आला. जिद्द,चिकाटी प्रामाणिकपणा अंगी असेल तर नक्कीच जीवनात यशस्वी व्हाल.व्यसन करू नका, आई-वडिलांची काळजी घ्या , त्यांना सांभाळा असा संदेश रविकांत पाटील यांनी दिला.सर्वांनी एकत्र प्रीती भोजनाचा आस्वाद घेतला.कार्यक्रमासाठी -प्रभाकर हंजगे ,डॉ उटगे, इसहाक पटेल,कुमारप्पा पाटील, दीपक पाटील, निलाप्पा घोडके,धर्मराज गोविंदे प्राचार्य - शिवबाळ मुली ,पर्यवेक्षक- संजय माने , नागनाथ कोरे , गौरीशंकर म्हमाणे, बशीर अहमद शेख ,दत्तात्रय कोळी, प्रकाश गजाकोस सौ. अकतनाळ,विश्र्वनाथ बानेगाव ,ज्ञानेश्र्वर कदम , राजशेखर विजापुरे ,श्रीशैल म्हमा !णे,नीलकंठ पाटील, यशवंत दुलंगे, मल्लिनाथ पाटील,रेवणसिद्ध भंगे,लेखनिक - रविकांत थ्वंटे, काशिनाथ शिरगुरे, विठ्ठल म्हेत्रे,अमृत गजधाने, उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.शेवटी आभार मनोज इंगोले यांनी मानले.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत फराळ आणि वसाहतीत सुविधांच्या रूपाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भाऊबीजेची ओवाळणी



मुंबई : स्वच्छता कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिलेला शब्द खरा करीत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कर्मचारी वसाहतीत जात त्यांच्यासोबत दिवाळीच्या फराळाचा आनंद घेतला. या वसाहती प्रमाणेच सर्व ४६ वसाहतींमध्ये सुविधा पुरवल्या जातील. फेब्रुवारी २०२४ पर्यंत ही कामे पूर्ण होऊन २९ हजार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना त्याचा लाभ होईल, असे यावेळी त्यांनी सांगितले.

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या कामांची पाहणी तसेच स्वच्छता कामगार आणि त्यांच्या कुटूंबियांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज कासारवाडी कामगार वसाहत दादर येथे आले होते. त्यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते बोलत होते. खासदार राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर, आमदार ड. मनीषा कायंदे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्र्विनी जोशी आणि डॉ. सुधाकर शिंदे यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि अभ्यासिकेचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी या वसाहती मध्ये भेट दिली होती. त्यावेळी स्थानिक नागरिकांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. त्या पूर्ण करण्याचा शब्द आपण दिला होता. तो पूर्ण केल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईचे आरोग्य चांगले ठेवणारे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय कोणत्या परिस्थितीत राहतात हे पाहावे म्हणून त्यावेळी भेट दिली होती. त्यांच्या मुलांनाही उच्च शिक्षण घेता आले पाहिजे, विविध स्पर्धा परीक्षासाठी या मुलांसाठी योजना सुरू केली आहे. सर्वसामान्य परिस्थितीत राहणारी मुले मोठ्या पदावर जावीत यासाठी अभ्यासिका उपयुक्त ठरणार असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, एकूण ४६ वसाहतीत अशा प्रकारच्या सोयीसुविधा देणारे काम करणार आहोत.महापालिका यंत्रणेने कमी कालावधीत चांगले काम केले आहे. अशा वसाहतीत २९ हजार कर्मचारी राहतात. त्यांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आपला दवाखाना माध्यमातून वसाहतीत चांगल्या आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. मुंबईत आतापर्यंत २०० दवाखाने सुरू केले आहेत. ३६ लाख लोकांनी याठिकाणी उपचार घेतले असल्याचे त्यांनी सांगितले.

हक्काची घरे या कर्मचाऱ्यांना मिळावीत यासाठी आपण प्रयत्न करतोय. तोपर्यंत चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.राज्य शासन हे सर्वसामान्यांचं असून त्यांच्यासाठी काम करत आहे. शेतकरी, कष्टकरी, महिला, युवा यांच्यासाठी काम करत आहे. काल गडचिरोली जिल्ह्यात नक्षलग्रस्त भागात जाऊन पोलीस बांधवांसोवत दिवाळी साजरी केली. आज स्वच्छता कर्मचारी बांधवांच्या वसाहतीत दिवाळी साजरी करण्यासाठी आलो असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.अशा वसाहतीतील मुलांना मैदान पाहिजे. उद्यान पाहिजे, सध्याची ही परिस्थिती बदलली पाहिजे या उद्देशाने काम सुरू केले आहे. आपण ठरवले तर काम होऊ शकते. सुधारणा होऊ शकतात. दोन महिन्यात कामे पूर्ण होतील, असा शब्द यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त आयुक्त श्री. शिंदे यांनी केले. कासारवाडी येथे सुसज्ज उद्यान, उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. खेळाचे मैदान, नवीन जल जोडणी आदी कामे करण्यात येत असल्याचे त्यांनीसांगितले.

# संत दामाजी कारखान्याची प्रगती करणे ही स्व की.रा. मर्दा यांना खरी श्रद्धांजली ठरेल : प्रा शिवाजीराव काळुंगे




पंढरपूर/प्रतिनिधीः श्री संत दामाजी सहकार साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन स्वर्गीय किसनलाल रामचंद्र मर्दा उर्फ मारवाडी वकील साहेब यांच्या १०७ व्या जयंती जयंती निमित्त कारखाना कार्यस्थळावर धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा शिवाजीराव काळुंगे कारखान्याचे विद्यमान चेअरमन श्री शिवानंद पाटील व्हायचं चेअरमन श्री तानाजी भाऊ खरात यांच्या हस्ते स्वर्गीय किसनलाल रामचंद्र मर्दा उर्फ मारवाडी वकील साहेब स्वर्गीय रतन शहा यांच्या पूर्णांक पुतळयास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले

याप्रसंगी बोलताना प्रा शिवाजीराव काळुंगे म्हणाले की स्वर्गीय किसनलाल रामचंद्र मर्दा उर्फ मारवाडी वकील साहेब यांनी कारखान्याचे चेअरमन म्हणून काम करीत असताना कारखान्याचा कारभार लोकांनी करून दाखवला त्यांचा आदर्श घेऊन सध्या आर्थिक अडचणीत असलेल्या कारखान्याचा विकास करण्यासाठी चेअरमन व संचालक मंडळ काटकसर करून कामकाज करीत आहेत करणाऱ्या शेतकऱ्यांची तोंडी पिले वाहतूक ठेकेदार यांच्या कामाची दिले व्यापारी देणे कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर करून हंगामासाठी घेतलेल्या बँकेची कर्ज वेळेवर परतफेड करून या संचालक मंडळावर सर्वांचा विश्र्वास आहे यापुढेही कारखान्याचे कामकाज व्यवस्थित करून प्रगती केल्यास संस्थापक चेअरमन स्वर्गीय मारवाडी वकील साहेब यांना खरी श्रद्धांजली तसेच साखर कारखाने कारखानदारी चांगली चालवायची असेल तर किंवा स्पर्धेत टिकवायचे असेल तर कर्मचाऱ्यांनी डोळ्यात तेल घालून काम करण्याची वेळ आली असलेले मत त्यांनी व्यक्त केले याप्रसंगी कारखान्याचे संचालक मुरलीधर दत्तू गौरीशंकर गुरुकुल गोपाळ भगरे राजेंद्र चंद्रकांत पाटील महाराज बेंद्रे दयानंद सोनवणे भिवा दोलतोंडे बसवराज पाटील दिगंबर भाकरे महादेव लुगडे तानाजी कांबळे तानाजी काकडे सुरेश कोळेकर व कार्यकारी अधिकारी संचालक रमेश जायभाय तसेच मनोज ठेंगे हनुमंत रोकडे यांच्यासह कारखान्याचे सर्व खाते प्रमुख विभाग प्रमुख सभासद शेतकरी उपस्थित होते

# दूध दर समितीने पडलेल्या दूध दराबाबत तात्काळ निर्णय घ्यावा : आ.समाधान आवताडे

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर मतदारसंघात दुग्ध व्यवसाय हा महत्वाचा उपजीविकेचा व्यवसाय आहे, दोन महिन्यांपूर्वी ३.५/८.५ गुणवत्तेला ३९ ते ४० रुपये दुधाचा दर मिळत होता मात्र सध्या तो दर कमी होऊन २५ ते २८ रुपयापर्यंत खाली आला आहे त्यामुळे दूध व्यवसाय अडचणीत आला असून उत्पादन खर्चही निघेना असे झाला आहे तरी शासनाने ठरवून दिलेला किमान ३४ रुपये इतका दर दूध उत्पादकांना देण्यात यावा अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी महसूल पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कडे केली आहे.



विखे पाटील यांना दिलेल्या पत्रामध्ये अवताडे म्हणाले आहेत की सध्या पावसाने हुलकावणी दिल्यामुळे पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात दुष्काळी परिस्थिती आहे शेतीकडून कोणतेही उत्पन्न शेतकऱ्यांना मिळाले नाही त्यामुळे उपजीविकेसाठी ते दुग्ध व्यवसायाकडे वळले आहेत मात्र चाऱ्याचे वाढलेले दर पशुखाद्याचे वाढलेले दर पाहता प्रति लिटर उत्पादन खर्च ३५ रुपयापर्यंत जात आहे आणि हाती दर २५ ते २८ रुपये मिळत असल्यामुळे मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे शासनाने नेमलेल्या दूध दर समितीने ३४ रुपये दर जाहीर करून सुद्धा खाजगी दूध संघ हा दर देण्यामध्ये असमर्थता दाखवत आहेत तरी आपण लक्ष घालून समितीची पुन्हा बैठक लावावी व तात्काळ दूध दराविषयीचा तोडगा काढून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशा आशयाचे पत्र देत अवताडे यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे दूधदर वाढवण्यासंदर्भात मागणी केलेली आहे.

# पंढरीत आरोग्यासाठी हायटक सुविधा उपलब्ध होत आहेत : परिचारक



पंढरपूर/प्रतिनिधीः सध्या जीवनामध्ये आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी पंढरपूर सारख्या शहरामध्ये हायटेक सुविधा निर्माण होत आहेत. अशात डॉ.शलाका शेडगे यांच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या लोटस क्लिनिकमुळे या सुविधांमध्ये भरच पडणार असून युवती, महीला व रूग्णांच्या आरोग्य समस्या सोडवण्यासाठी हे लोटस क्लिनिक यशस्वी होईल असा अशावाद माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी व्यक्त केला आहे.

पंढरपूर येथे डॉ .शलाका शेडगे यांच्या लोटस या क्लिनिकचे उद्घाटन माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाशीम जिल्हा भुमीअभिलेख कार्यालयाचे अधिक्षक शिवाजी भोसले, अस्थीरोग तज्ञ डॉ .प्रशांत निकम, डॉ.पाचकवडे, बाजार समितीचे संचालक दिलीप चव्हाण, अशोक शेडगे, डॉ.अनुजा शेडगे, ग्र.प.सदस्य उषा शेडगे यांच्यासह पदाधिकारी, ग्रमस्थ व शेडगे कुटूंबीय उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आमदार परिचारक यांनी सांगितले कि, रोपळे सारख्या ग्रमीण भागातून मोठ्या जिद्दीने आपल्या मुलींना उच्च शिक्षण देवून त्यांना डॉक्टर केले. तर अशा जिद्दी आई वडीलांचे स्वप्न साकार करीत आई वडीलांच्या कष्टाचे चिज करणार्या दोन्ही डॉक्टर बहीणींचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. खरे पाहता शेडगे कुटूंबाने मुलींच्या शिक्षणाची मोठी प्रेरणा समाजा पुढे उभी केली आहे. असे सांगितले. या कार्यक्रमासाठी पंढरपूर व रोपळे परिसरातील नेतेमंडळी , सामाजिक कार्यकर्ते व ग्रमस्थ उपस्थित होते. डॉ .अनुजा शेडगे यांनी उपस्थितांचे अभार मानले.

### यशस्वी शिक्षणातून मुलांनी आई वडीलांचे स्वप्न साकारावे.......

आपल्या पाल्यांनी उच्च शिक्षण घेवून महत्वपुर्ण पदाला गवसणी घालावी अशी सर्वच आई वडीलांची आशा असते. त्या स्वप्नांना आकार देण्यासाठी मुलांनी मोठ्या जिद्दीने शिक्षणाचे शिखर गाठले पाहीजे. डॉ .अनुजा आणि डॉ .शलाका यांनी याची जाणीव ठेवून आपल्या आई वडीलांचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. याचा सर्वांच मोठा अभिमान आहे. आरोग्य सेवे बरोबरच सामाजिक सेवेचे मोठे कार्यही या भगीनींकडून भविष्यात होईल हिच अपेक्षा.

**शिवाजी भोसले, जिल्हा भुमीअभिलेख कार्यालय अधिक्षक , वाशिम**

# सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही पक्षाला जनतेच्या सर्वांगीण हितासाठी कार्य करावे

## जोतिबा फुल्यांचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल या विषयावर प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना, जनतेला जागृत करण्यासाठी १७ नोव्हेंबर १९५१ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक येथील निवडणूक प्रचारसभेत म्हटले होते की, सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही पक्षाला जनतेच्या सर्वांगीण हितासाठी जोतिबा फुल्यांचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल. या विधानाची प्रासंगिकता लक्षात घेऊन विधानाच्या ७३ व्या वर्धापनदिनानिमित्त या ज्वलंत विषयावर बामसेफ अंतर्गत फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने जनसंपर्क कार्यालय द्वारा बी. बी. मेश्राम, साकेत नगर (पेठे नगर), छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जेणेकरून फुले शाहू आंबेडकराईट चळवळीचे संघटनात्मक कार्यात वृद्धी होऊ शकेल.

या कार्यशाळेचे उदघाटन सत्यशोधक समाजाचे राज्य अध्यक्ष के. ई. हरदास म्हणाले की, इंग्रजानी त्यांच्या काळात विद्यापीठाची निर्मिती केली ही फार मोठी शैक्षणिक क्रांती होती. ज्यातून फुले शाहू आंबेडकरासारखे महामानव घडले. फुले बागायती जमीनदार होते. त्यांचे मूळ नाव गोरे होते. फुलांच्या व्यवसायावरून ते फुले झाले. त्यांनी विश्र्वाचा निर्माता तो निर्मिक अशी संकल्पना मांडली होती. तसेच सावकारी निर्मूलन व कराची माफी ही सुद्धा फुल्यांचीच संकल्पना होती. आ. ह. साळुंखे यांनी म्हटल्याप्रमाणे आपल्या धडावर आपलेच डोके ठेवून स्वयं प्रकाशित व्हावे लागेल, तरच आपण फुल्यांचे धोरण राबवू शकतो.

याप्रसंगी अँड. धनेश गवळी म्हणाले की, भारताचे संविधान समजावून सांगण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांनी पार पाडली पाहिजे. भाऊसाहेब खंडागळे म्हणाले की, आपण मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. महिलांना सामावून घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. हिरामण अहिरे म्हणाले की, स्त्रियांच्या शिक्षणावरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. ही दूरदृष्टी ठेवून फुल्यांनी सावित्री बाईंना शिक्षणातून पुढे आणले. संघराज धम्मकिर्ती म्हणाले की, ७१ व्या वर्षी सुद्धा हरदास साहेब तरुणाला लाजवेल असे कार्य करीत आहेत, अशावेळी आपण कुठे आहोत? याचा शोध घेतला पाहिजे. या अनुषंगाने सत्ताधा-यांची भूमिका तपासली पाहिजे. मुस्लिम समुदायाची वाईट अवस्था बदलण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. शैलेंद्र मिसाळ म्हणाले की, माळी सावता माळ्यांना मानतात पण फुल्यांना नाही. मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी फुल्यांना गुरू मानल्यामुळे आंबेडकरवाद्यांनी फुले जीवंत ठेवले आहेत. तसेच मराठ्यांनी सुद्धा शाहू महाराजांना स्विकारल्याचे पहायला मिळत नाही.प्रमुख वक्ते अँड.




दत्ता ढोबळे म्हणाले की, हे त्या विशिष्ट कालखंडातील राजकीय वाक्य आहे. लालकृष्ण अडवाणी यांनी रथयात्रा काढून ओबीसींची दिशा बदलण्याचे काम केले आहे. आज विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी लढावे लागत आहे. हा न संपणारा संघर्ष आहे.

या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या निवडणुकीतील प्रचार दौ-यात बोलताना स्पष्ट केले की, समाजवादी पक्षासोबत मतभिन्नता असली तरी दिशा मात्र एकच असल्याने एकत्रित लढण्याचे ठरविले होते. ब्राह्मणेत्तर पक्षाची मुहूर्तमेढ महात्मा फुल्यांनी रोवली होती. म्हणून या पक्षाचे अनुयायी स्वतःला फुल्यांचे अनुयायी म्हणू लागले, परंतु त्यांनी जोतिबांचे कार्यक्रम आणि धोरण यास तिलांजली दिली आहे. ज्यामुळे ते काँग्रेसमध्ये सामील झाल्याने ब्राह्मणेत्तर पक्ष नामशेष झाला. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर आधारित दाभाडी प्रबंध यावर व्यक्त होतांना त्यांनी स्पष्ट केले आहे की, कम्युनिझममुळे देशाच्या स्वातंत्र्याची राखरांगोळी होणार आहे, हे आपण दृष्टीआड करू शकत नाही. या विचाराने शेकाप हा पक्ष चालत असल्याने आपण त्यांच्या सोबत जाऊ शकत नाही. फुल्यांनी राईटस आफ मॅन लिहिणा-या थॉमस पेन पासून मानवतावादाची प्रेरणा घेतली होती म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी माणूसकी च्या नात्याने त्यांना वैचारिक गुरू मानले होते. आपणास लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊन पुढे जायचे असेल तर सर्व संवैधानिक समूहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रतिनिधित्व बहाल करने आवश्यक आहे. मात्र वर्तमान व्यवस्था १६.६% जनसंख्या असलेल्या अनुसूचित जाती या समूहाला ३.६१% तर ८.६% जनसंख्या असणाऱ्या अनुसूचित जमाती साठी २.२६% बजेट चे प्रावधान करीत असेल तर त्यांच्यात आर्थिक समानता कशी निर्माण होईल? देशातील शिक्षणावर एकूण बजेटच्या ६% खर्च होणे अपेक्षित असताना फक्त २.३७% खर्च होत असेल तर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची दुरावस्था होईल. याचे भान ठेवून लोकशाहीवादी तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करावी लागेल. करिता बेग हॉट च्या तत्त्वज्ञानाप्रमाणे चर्चेतून चालणारे शासन अस्तित्वात येण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

या कार्यशाळेला अँड. धनेश गवळी, चंद्रकांत मगरे, शैलेंद्र मिसाळ, संघराज धर्मकिर्ती, यश खंडागळे, हिरामण अहिरे, भाऊसाहेब खंडागळे, अँड. दत्ता ढोबळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांनी विषयाच्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले आहे. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली.

# सिताराम कारखान्याची चालू गळीत हंगामाचे पंचवीस रुपये चा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा : डॉ. राजलक्ष्मी काळुंगे-गायकवाड

पंढरपूर/प्रतिनिधीः सिताराम कारखान्याची चालू गळीत हंगामाची पंचवीस रुपये चा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा डॉ. राजलक्ष्मी काळुंगे गायकवाड यांनी सांगितले पंढरपूर मंगळवेढा सांगोला या तिन्ही तालुक्याची मध्यवर्ती भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी संजीवनी असलेल्या खर्डी येथील सिताराम महाराज साखर कारखान्याच्या गळीत हंगाम जोमाने सुरू असून या हंगामात पहिला दहा दिवसाचा मास्टर मधील गाळप झालेल्या उसाला प्रति टन २५०० रुपये प्रमाणे पहिला हप्ता संबंधित ऊस पुरवठा दार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आला आहे अशी माहिती कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजलक्ष्मी काळुंखे गायकवाड यांनी दिली

शासनाच्या आदेशानुसार एक नोव्हेंबर पासून कारखान्याचा गळीत हंगाम सुरू करण्यात आला होता त्यानुसार गाळप झालेल्या उसाला पहिला हप्ता २५०० रुपये प्रति टन त्याप्रमाणे धनश्री बँकेत संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे चालू वर्षी कारखान्याचे विस्तारीकरण झाले असून दररोज साधारणपणे तीन हजार पाचशे मीटर क्षमतेने उसाचे गाळप सुरू झाले आहे परंपरा कायम ठेवण्यात येणार आहे. कारखान्याच्या घरी हंगाम सक्षमपणे सुरू असून चालू आहे सांगा चार लाख मॅट्रिक टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट आहे या दृष्टीने सर्व यंत्रणा नियोजनबद्ध रित्या कामाला करीत आहे ठरवलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी आपला पिकवलेला सिताराम महाराज



साठी देऊन सहकार्य करावे असे आव्हान कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तथा धनश्री व सिताराम परिवाराचे संस्थापक प्रा शिवाजीराव काळुंगे यांनी केले आहे

# ऐतिहासिक राम तलावात १०८ फूट उंचीची श्री स्वामी समर्थांची पंचधातूची मूर्ती भूमिपूजन

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट संस्थानचे व शहराचे नाव जागतिक स्तरावर पोहचावे आणि पर्यटन क्षेत्राला वाव मिळावा यासाठी अक्कलकोट संस्थानचे नरेश श्रीमंत मालोजीराजे संयुक्तराजे भोसले हे अक्कलकोट शहरालगत असलेल्या ऐतिहासिक राम



तलावात १०८ फूट उंचीची श्री स्वामी समर्थांची पंचधातूची मूर्ती व त्या बाजूच्या ३५ एकर परिसरात अक्कलकोट तालुक्यातील गोरगरीब जनतेसाठी रुग्णालय, स्वामी भक्तांसाठी भक्तनिवास, ध्यान साधनागृह, श्री स्वामी समर्थ महाराजांचे जीवन चरित्र साकारणार आहेत. १०८ फूट उंचीची मूर्ती प्रसिद्ध शिल्पकार श्री भगवान रामपुरे हे बनविणार असून त्याची तयारी सुरू झालेली आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन आज गुरुवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता अक्कलकोट संस्थानचे नरेश श्रीमंत मालोजीराजे भोसले यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमास श्रीमंत मालोजीराजे भोसले यांचे बंधू श्रीमंत सयाजीराजे भोसले व मामा श्री आशिष कदम, जगविख्यात शिल्पकार श्री भगवान रामपुरे, सिने अभिनेता अशोक कुलकर्णी, पवन कुलकर्णी गुरुजी, राहुल पाबळकर, अमित आलुरकर, निरव झमतानी, अक्षय सतीश चव्हाण, कुणाल सुनील भोसले, अभिषेक सिंह गौर, गणेश बडे, डॉ. विपुल शहा, जयसिंह पाटील, रोहित जिरोळे, शक्ती टोने, रोहन जिरोळे ,लक्ष्मण रामपूरे , श्रीपाद पुजारी , अशोक पाटिल, सिद्धार्थ बिंदगे, गणेश दिवाणजी , शशिकांत लिंबितोटे, किरण करत, शेकप्पा माने हे उपस्थित होते.

# अभिनेते देव आनंद जन्मशताब्दी वर्षानिमित्त कॉफी टेबल बुकचे प्रकाशन

मुंबई : प्रसिद्ध अभिनेते देव आनंद भारतीय चित्रपट विश्र्वातील एक दंतकथा होते. आपल्या करिष्माई व्यक्तित्वाने तसेच अभिनय कौशल्याने त्यांनी जनमानसावर अमीट छाप निर्माण केली. त्यांच्या चित्रपटांना दशके लोटली तरी देखील आजही त्यांच्या चित्रपटांमधील गाणी लोकांच्या जिभेवर आहेत. भारतीय चित्रपटाच्या सुवर्ण युगाचे ते एक निर्माते होते, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले. देव आनंद यांच्या १०० व्या जयंती निमित्त त्यांच्यावरील 'के दिल अभी भरा नहीं' या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल श्री. बैस यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १७) मुंबई येथील वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते.

देव आनंद चित्रपट सृष्टीत आले, त्यावेळी भारतीय सिने सृष्टी एका वेगळ्याच उंचीवर होती. त्याकाळात एकापेक्षा एक अभिनेते व अभिनेत्रीच नव्हते, तर उत्कृष्ट गीतकार व संगीतकार देखील होते, असे सांगून आज देखील गाण्याच्या रिलिटी शो मध्ये लहान मुले जुनीच गाणी गातात यातच त्या गाण्यांचे यश आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

गेल्या काही वर्षात गुणगुणता येतील अशी गाणीच निर्माण होत नाहीत असे सांगून, संगीताच्या नावाखाली जे काही निर्माण होत आहे तो केवळ कल्लोळ आहे, अशी खंत राज्यपालांनी व्यक्त केली. राज्यपाल पदाचा राजशिष्टाचार असल्यामुळे थिएटर मध्ये जाऊन सहज चित्रपट पाहता येत नाही किंवा मुंबईची प्रसिद्ध पाव भाजी खाता येत नाही या बद्दल खंत व्यक्त करुन एकेकाळी आपण मित्रांसह, रांगेत उभे राहून व प्रसंगी 'ब्लॅक' मध्ये तिकिटे घेऊन, चित्रपटांचे पहिल्या दिवशी पहिला शो पाहत असू, अशी आठवण श्री. बैस यांनी सांगितली. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी बसने लाहोर येथे जाताना त्यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांना 'भारतातून काय आणू' असे विचारले. त्यावर, भारतातून देव आनंद यांना घेऊन यावे, असे शरीफ यांनी सांगितले, व त्या नुसार वाजपेयी हे देव आनंद यांना घेऊन लाहोर येथे गेले, अशी आठवण राज्यपालांनी यावेळी सांगितली.

देव आनंद यांच्या चित्रपटांनी प्रेक्षकांचे केवळ मनोरंजनच केले नाही, तर त्यांनी लोकांचा आत्मविश्र्वास व आकांक्षा जागवल्या तसेच राष्ट्रीय एकात्मतेला चालना दिली असे राज्यपालांनी सांगितले.

देव आनंद यांच्या वरील या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज व वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई यांच्या पुढाकाराने करण्यात आले. प्रकाशन सोहळ्याला वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष विजय कलंत्री, उपाध्यक्ष अजय रुईया, कझाकस्थानचे मानद वाणिज्यदूत महेंद्र सांघी, कोरस इंडियाचे अध्यक्ष आनंद थिरानी, वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या कार्यकारी संचालक रूपा नाईक, गायक अनुप जलोटा यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनुप जलोटा यांनी देव आनंद यांच्या गाण्याच्या ओळी गायल्या.

# नन्हेगाव येथे महानगरपालिका सिटी बस सुरू करण्याची मागणी वाहतूक सेवा नसल्याने ग्रामस्थांना अडचण

दर्शनाळ : देविदास माने

अक्कलकोट तालुक्यातील नन्हेगाव येथे सोलापूर महानगरपालिकेची सिटी बस सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. नन्हेगाव परिसरातील पितापूर हन्नूर बोरेगाव डोंबरजवळगे दर्शनाळ आदी परिसरातील नागरिक




कामानिमित्त दररोज सोलापूर येथे जातात पण शासकीय वाहतूकीची सोय नसल्याने नागरिकांना नाईलाजाने खाजगी वाहनाने प्रवास करावे लागत आहे परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी सोलापूर येथे ये जा करत आहेत वाहनांची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेत वेळेवर जाता येत नाही यामुळे शालेय मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. गेल्या पाच वर्षांपासून सिटी बस सेवा बंद आहे. दर्शनाळ पितापूर नन्हेगाव हन्नूर धोत्री बोरेगाव डोंबरजवळगे दर्गनहळ्ळी शिरपनहळ्ळी आदी गावातील शेतकऱ्यांना भाजीपाला विक्री करण्यासाठी सोलापूरला जावे लागते पण वाहतूकीची सोय नसल्याने हजारो रुपये खर्च करून उत्पादन घेतलेल्या पालेभाज्या शेतात सडून जात आहे. गेल्या पाच वर्षांपूर्वी सोलापूर नन्हेगाव महानगरपालिकेची सिटी बस रस्त्यावर धावत होती पण ती सध्या बंद आहे . नन्हेगाव येथे सिटी बस सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे पण दखल घेण्यात आले नाही . खाजगी वाहतूकदार अव्वाच्या सव्वा दर आकारत आहेत यामुळे परिसरातील नागरिकांना खिशाला चाट पडत आहे नन्हेगाव येथे एस टी अथवा सिटी बस उपलब्ध नाही त्यामुळे नागरिकांना नाईलाजाने जीव धोक्यात घालून प्रवास करावे लागत आहे. तरी नन्हेगाव येथे महानगरपालिकेची सिटी बस सुरू करावी अशी मागणी नन्हेगाव परिसरातील नागरिकांनी केली आहे.